


सत्यमेव जयते

**अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय वविशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

बी-२०१/२०२ अर्जुन सेंटर, स्टेशन रोड, गोवंडी (पु) मुबई- ४०० ०८८

समता न्याय एकात्मता

रजि नं :४३७६०३ EMAIL ID: md.arti@org.in website: https://arti.org.in फोन नं: ०२२- २५००११४/२५५००११५/४४५१५८५४


जा.क्र./ आर्टी-मुंबई/ASNRF अधिछात्रवृत्ती जाहिरात/२०२६-२०२७/१६४० दिनांक : २७/०८/२०२६

# पीएच.डी. अधिछात्रवृत्ती बाबत घोषणापत्रक

अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई यांच्यामार्फत संबंधित प्रवर्गातील संशोधक विद्यार्थ्यांसाठी अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (ASNRF) योजना राबविण्यात येते. सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र शासनाने सर्वंकष धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार, आर्टी, मुंबई संस्थेमार्फत **दिनांक १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२५** या कालावधीत पीएच.डी. करिता कायम नोंदणी असणाऱ्या संबंधित प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून पीएच.डी. अधिछात्रवृत्ती वर्ष २०२३, २०२४ व २०२५ करिता दिनांक ०४/०८/२०२६ पासून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

आर्टी, मुंबई संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे करण्यात आली होती. त्यानुसार, अधिछात्रवृत्ती वर्ष २०२३ करिता दिनांक ०१/०६/२०२३ रोजी संशोधक विद्यार्थ्याचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे, असे नमूद करण्यात आले होते. तथापि, अधिछात्रवृत्ती **सन २०२३ करिता दिनांक १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत पीएच.डी. करिता कायम नोंदणी असणाऱ्या संबंधित प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सदर घोषणापत्रकाद्वारे कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे करण्यात येत आहे याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

स्वाक्षरी/-

( सुनील वारे )

**व्यवस्थापकीय संचालक**

**अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था**

**( आर्टी ), मुंबई**